**आर.सी.सी.क्र. १५०/२०२२**
**<u>नि.२६</u>**

**सरकारतर्फे सा.क्र.२**
मी या व्दारे सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की
माझे नाव : स्वाती दादासाहेब सोनवणे,
वय : ३२ वर्षे, धंदा - शेती,
राहणार : हिंगोणी, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. पी. औताडे यांचे मार्फत</u>** -

आरोपी क्र. १ हा माझा लहान दिर असुन आरोपी क्र. २ ही लहान जाउ आहे. फिर्यादी हा माझा पती आहे. घटना दि. १९/०२/२०२२ रोजी सांयकाळी ६.०० वाजता आमच्या घराच्या समोर घडली होती. घटनेच्या वेळी मी, माझे पती व मुले आमच्या घरी होतो. त्यावेळी आमच्या घरासमोरुन आरोपी क्र १ चा बटाईदार गुलाब खिलारे चालला होता. त्यास पाहुन माझे पती दादासाहेब घराच्या बाहेर आहे. पतीच्या पाठोपाठ मी बाहेर आले. माझे पती दादासाहेब व बटाईदार गुलाब खिलारे यांच्यामध्ये मोटारच्या पाण्यासंदर्भात बातचीत चालु होती. त्यावेळी आरोपी क्र. २ ही घराच्या थोडया अंतरावर उभी होती. तिने माझे पती दादासाहेब व बटाईदार बोलत असतांना पाहीले व माझे पतीस शिवीगाळ देण्यास सुरवात केली. आरोपी क्रं. २ माझे पतीस म्हणाली की, तुझ्या गांडीत पाय घालते, अश्या अनेक प्रकारच्या शिव्या दिल्या. त्यानंतर आरोपी क्र. १ तिथे हातात गज घेवुन आले. त्यानंतर आरोपी क्र. १ व २ यांनी माझे पतीस लाथाबुक्यांनी मारहाण केली व आरोपी क्र. १ याने डोक्यात गजाने मारहाण केली. मी तिथे जाईपर्यत आरोपी क्र. १ व २ यांनी माझे पतीस खाली पाडले व जखमी केले. मी सोडविण्याकरीता गेले असता आरोपी क्र. २ हिने मला मारहाण केली. आरोपी क्र. १ याने मला गजाने डाव्या पायावर मारहाण केली. सदर झटापटीत माझे गळयातील मंगळसुत्र गहाळ झाले. आरोपी क्र १ व २ यांनी आम्हाला तुमचा काटा काढु अशी जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आम्ही शनिशिंगणापुर पोलीस स्टेशनला गेलो. पोलीस स्टेशनमधुन आम्हाला नेवासा ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. तिथे मी व माझया पतीने उपचार घेतले. उपचारानंतर आम्ही पुन्हा पोलीस स्टेशनला गेलो. माझे पतीने फिर्याद नोंदविली. आम्हाला आरोपी क्र. १ ने ज्या गजाने मारहाण केली तो दाखविल्यास मी ओळखु शकते. आता मला आर्टीकल ‘अ दाखविण्यात आले. आम्हाला मारहाण केलेला तोच गज आहे. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे ॲड. पी.डी. गर्जे यांचे मार्फत सुरु -</u>**

२. आज रोजी मी व फिर्यादी न्यायालयात मोटरसायकलने आलो. हे म्हणणे खरे नाही की, आमचे व आरोपींचे नेवासा न्यायालयात शेतीवरुन वाद चालु आहेत. हे म्हणणे खरे आहे की,

आमची व आरोपीची शेती शेजारी -शेजारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे घर शेतात आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घराकडे येण्यासाठी सोनई- हिंगोणी हा रोड आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला आमच्या घराकडे ४ नंबर चारीने यावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घराकडे येणारा रस्ता कच्चा आहे. घटनेच्या वेळी रस्ता कच्चा होता. आमच्या घराच्या पश्चीमेस येळवंडे यांच्या वस्ती आहे. साक्षीदार स्वत: सांगते की, त्या वस्त्या आमच्या घरापासुन लांब आहेत. सदर वस्त्या आमच्या घरापासुन किती लांब आहेत यांचे अंतर मी सांगु शकत नाही. माझे इयत्ता दहावी पर्यत शिक्षण झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मराठी लिहीता वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घराच्या उत्तरेस जरे यांच्या वस्त्या आहेत. जरे यांच्या वस्त्या आमच्या घराच्या पुर्वेस आहेत. परंतु त्या घराच्या लांब आहेत. सामाईक विहीर आमच्या शेतात आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचे व आरोपींचे पाण्याच्या पाळीवरुन कायम वाद होत असतात. हे म्हणने खरे आहे की, सामाईक विहीरीतुन आरोपी पाणी घेतात. घटनेचा आवाज ऐकुन आजुबाजुचे लोक जमा झाले होते. माझे पती जखमी झाले असल्याने मी गडबडुन गेले होते त्यामुळे लोक कोण जमा झाले होते हे मी सांगु शकत नाही. खिलारे घटनास्थळी उपस्थित होता. घटना अंदाजे अर्धा ते एक तास चालु होती. माझे घर ते पोलीस स्टेशनचे अंतर मी सांगु शकत नाही. आमच्या घरापासुन पोलीस स्टेशनला जाण्यासाठी अंदाजे विस ते पंचविस मिनिटांचा कालावधी लागतो. घटनेच्या दिवशी पोलीस स्टेशनला आम्ही किती वाजता पोहचलो हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशनला जाण्यासाठी मी व माझे पती व्यतिरिक्त दुसरे कुणी नव्हते. आमच्या सोबत चालक होते. चालकाचे नाव मला सांगता येणार नाही. घटनेचया दिवशी डॉक्टरांनी आम्हाला ॲडमिट करुन घेतले नाही. डॉक्टरांनी नगरला जाण्याचा सल्ला दिला होता. नगरला जाण्यासाठी आम्हाला लेखी कागद दिला होता. तो कागद मी न्यायालयात दाखल करु शकत नाही. त्याप्रमाणे माझे पतीला नगर येथे उपचार घेतले. ते कागद मी दाखल करु शकत नाही कारण नगर येथे आम्हाला सांगण्यात आले होते की ते पेपर आम्ही पोलीस स्टेशनला पाठवुन देवु. नगरला सरकारी दवाखान्यात उपचार घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे पती हिंगोणी सोनई रस्त्याने येत असतांना गाडीवरुन पडलो त्यामुळे आम्हाला जखमा झाल्या. पोलीस स्टेशनला आम्ही २ वेळा गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद दिल्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला गेलो नाही. मी पोलीसांना जबाब दिला होता. जबाब किती तारखेला दिला होता याची तारीख सांगु शकत नाही. माझा जबाब घरी घेण्यात आला होता. पोलीस आले त्यावेळी मी माझे पती व मुले तिथे होतो. तसेच सासुसासरे बाजुला राहतात तेही उपस्थित होते. हे म्हणणे खरे नाही की, याव्यतिरिक्त तिथे कोणीही नव्हते. तुझ्या

गांडीत पाय घालते, हा मजकुर मी जबाब देतेवेळी पोलीसांना सांगीतला होता. सदरचा मजकुर माझे जबाबात का नमुद नाही हे मी सांगु शकत नाही. माझा जबाब मी वाचला होता. पोलीसांनी मी सरतपासात सांगितलेली शिवीगाळ माझे जबाबात लिहीली नाही म्हणुन मी तक्रार दाखल केली नाही. आरोपींचे व माझे सासु-सासरे यांचे संबध कसे आहेत हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ मी आज प्रथमत: न्यायालयात पाहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गाडीवरुन पडलेल्या जखमाचा फायदा घेवुन मी आरोपीविरुध्द खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती दादासाहेब व बटाईदार बोलत असतांना आरोपी क्र. २ हिने पाहीले व माझे पतीस शिवीगाळ देण्यास सुरवात केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ तिथे हातात गज घेवुन आले व त्यानंतर आरोपी क्र. १ व २ यांनी माझे पतीस लाथाबुक्यांनी मारहाण केली व आरोपी क्र. १ याने डोक्यात गजाने मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी तिथे जाईपर्यत आरोपी क्र. १ व २ यांनी माझे पतीस खाली पाडले व जखमी केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सोडविण्याकरीता गेले असता आरोपी क्र. २ हिने मला मारहाण केली व आरोपी क्र. १ याने मला गजाने डाव्या पायावर मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर झटापटीत माझे गळयातील मंगळसुत्र गहाळ झाले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र १ व २ यांनी आम्हाला तुमचा काटा काढु अशी जिवे मारण्याची धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचे व आरोपींचे शेतीचे वाद असल्याने आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगीतल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पतीच्या सांगण्यावरुन मी आज रोजी खोटा जबाब दिला.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती

सही/-
**(ए.एन.सरक )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.३, नेवासा

दिनांक : १९/११/२०२४